
# लोक-सेवक



प्राणदाता

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क. ६२३४
IRBK-0106234

लेखक : अमरेन्द्र

# डॉ. श्वाइत्झर

## लोक-सेवक : २

•

" ज्यासि आपंगिता नाहीं ।
त्यासि धरी जो हृदयीं ।
तोचि साधु ओळखावा ॥ "

अमरेन्द्र

म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
का. क्र. ..६२३७ नों. दि ..............
वि. ...आ. वा.... क्र. ..................

IRBK-0106234

किंमत ५० नये पैसे

वोरा अँन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

प्रकाशक :
एम. के. वोरा, वोरा अ‍ॅन्ड कं. पब्लिशर्स प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

लेखक :
अमरेन्द्र

आवृत्ति :
पहिली–१९५७

पानें :
बत्तीस

किंमत :
पन्नास नये पैसे

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर, स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनवार पेठ, पुणें २.

# उद्देश

आपल्या देशांत थोर सेवावीर होऊन गेले; आहेतहि. परदेशांतहि मोठमोठे सेवावीर झाले आहेत. डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर हे एक असेच सेवावीर आहेत. ते उत्तम पियानो-वादक आहेत. मोठे तत्त्वज्ञानी व धर्मशास्त्रज्ञ आहेत. वास्तविक त्यांचा वैद्यकाशीं-डॉक्टरीशीं कांहीं संबंध नव्हता. परंतु मानवसेवेचें ध्येय त्यांनीं तरुणपणींच ठरविलें. त्यासाठीं त्यांनीं आपला आवडता पियानो बाजूला सारला. तत्त्वज्ञान-धर्मशास्त्र यांचीं पुस्तकें गुंडाळून ठेवलीं. आणि ते वैद्यक शिकूं लागले. खरेखुरे डॉक्टर झाले. आफ्रिकेंतल्या अति उष्ण हवेच्या प्रदेशांत औषधें कशीं द्यावींत हें ते मुद्दाम शिकले. आणि आपला देश, आपलें घर, आपल्या आवडत्या गोष्टी सोडून हजारों मैल दूर आफ्रिकेंत गेले. आपल्या देशाचे, आपल्या धर्माचे, आपल्या रक्ताचे नसलेले नीग्रो त्यांनीं जवळ केले. अशिक्षित, रानटी, असंस्कृत, अडाणी पण प्रामाणिक आदिवासी लोकांच्या मदतीला ते धांवून गेले. पैसा, शरीरबळ, मन सारें सारें त्यांनीं त्यांच्या-साठीं वेचलें. त्यांना नुसतीं औषधेंच दिलीं नाहींत, प्रेमहि दिलें. अर्थात त्या निग्रोंचें प्रेमहि त्यांना मिळालें. ते त्यांच्याशीं जिवाभावानें वागूं लागले; त्यांचे झाले.

डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर हे तसे ' मिशनरी ' नाहींत. आपण आपल्या इकडे ज्यांना ' मिशनरी '—ख्रिस्ती धर्मप्रचारक म्हणतों तसे नाहींत. त्यांनीं तर 'आपण धर्मप्रचार, धर्मोप-देश करणार नाहीं ' असेंच वचन दिलें होतें. पण माणसाचें मन असें आहे कीं, जें वेळीं शब्दांनीं वळत नाहीं पण कामानें, प्रत्यक्ष वागणुकीनें चटकन् विरघळतें. श्वाइत्झरनीं प्रत्यक्ष धर्मप्रचार केला नसेलहि; परंतु त्यांच्या कामांतून त्यांच्या धर्माचा संदेश त्यांनीं जरूर पोहोंचविला. अप्रत्यक्ष-पणें आफ्रिकेंतील लक्षावधि आदिवासींच्या अंतःकरणांत

तो जाऊन पोहोंचला. त्यांतल्या हजारोंनीं पुढें खिस्ती धर्मंहि स्वीकारला. ते त्यांचे झाले. त्यांच्या सत्तेखालीं आधीं होतेच, ते कायम झाले.

कर्तबगार माणसांपुढें दोन मार्ग असतात माणसें जिंकण्याचे–आपलीशीं करण्याचे. एक सत्ता व दुसरा सेवा. ज्यांनीं पहिला मार्ग स्वीकारला ते स्वत: नाश पावले, लोकांनाहि त्यांनीं देशोधडीला लावलें. ज्यांनीं दुसरा रस्ता धरला ते स्वतः तरले, अजरामर झाले; आणि त्यांनीं लोकांनाहि आपलेंसें करून टाकलें.

आपण असें म्हणतों कीं, आपल्याला आपल्या धर्माचा, संस्कृतीचा, देशाचा अभिमान आहे. या देशधर्माच्या भावां-बहिणीवर आपलें प्रेम आहे. हे तर आपल्याच रक्ताचे आहेत. त्यांचीं दुःखें आपल्याला दिसतात का? त्यांचा विचार आपण कधीं करतों का? तीं कमी करण्यासाठीं आपण कांहीं हातपाय हालवतों का?–परिस्थिति अशी आहे कीं, खेड्यांतल्या शाळेवर जायला चांगला 'मास्तर' आपल्याला मिळत नाहीं. खेडेगांवांत जाऊन राहणें वैद्य-डॉक्टरांच्या जिवावर येतें. जंगलांतल्या आदिवासी केंद्रावर काम करायला चांगल्या माणसांची वाण सरकारलाहि भासते. गांधीजींपासून आपण सेवाव्रत शिकलों आहोंत, हें म्हणणें कोण खरें मानील?

मागच्या पुस्तकांत वंदनीय ठक्करबाप्पांचें चरित्र सांगितलें. यांत डॉ. आल्बर्ट श्वाइत्झरचें–एका परक्या थोर माणसाचें सांगितलें. उद्देश एकच कीं–आमच्या मनांत सेवाधर्माचा एखादा किरण शिरावा-रिघावा. दिखावू सेवेच्या हजारों काजव्यांपेक्षां अशा खऱ्या प्रखर सेवेचा एखादा किरणहि देशाला फायदेशीर आहे–निकडीनें हवा आहे.

—अमरेन्द्र



# डॉक्टर आल्बर्ट श्वाइत्झर

भारत देश आशिया खंडांत आहे. तसा जर्मनी हा एक देश युरोप खंडांत आहे. जर्मन देशाचें नांव मोठें आहे. फार मोठीं माणसें या देशांत होऊन गेलीं. अशा एकाचें हें चरित्र आहे. त्याच्या हयातीची ही हकीगत आहे.

त्याचें नांव डॉक्टर आल्बर्ट श्वाइत्झर. उच्चारायला जरा कठीणच. पण माणूस कमालीचा मृदु-मऊ अंतःकरणाचा. " मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास " असें श्री तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे तसा. आणि श्वाइत्झर मोठ्या अर्थानें ' विष्णुदास ' आहेतहि. विष्णु म्हणजे तरी देवच. देवाचे दास या अर्थानें स्वाइत्झरना ' विष्णुदास ' म्हटलें तर चुकणार नाहीं. त्यांचा धर्म ख्रिश्चन. ते येशू ख्रिस्ताला मानतात; आणि त्याच्या द्वारां देवाचें दास्य करतात. आपण त्याला देव म्हणतों–इंग्रजींत ते त्याला ' गॉड ' म्हणतात. हे ' विष्णुदास ' जसे ' मेणाहून मऊ ' असतात तसे ' वज्राला भेदून जाण्याइतके कठीणहि ' असतात. श्वाइत्झरना हें सारें वर्णन लागू पडतें. माणसाच्या दुःखाची आंच लागून त्यांच्या मनाचें मेण सहज वितळूं लागतें. परंतु तसेंच त्यांच्या कल्याणासाठीं कांहीं करायचें ठरलें म्हणजे?

मग त्याच्या आड अडचणींचे प्रचंड पर्वत का येईनात ? ते फोडून पलीकडे जाण्याइतका पोलादी कठीणपणा त्यांच्यापाशीं आहे.— आणि अशीं जीं माणसें असतात तींच थोर. म्हणून तर त्यांचीं चरित्रें वाचायचीं आणि त्यांच्या गोष्टी ऐकायच्या. सर्वसामान्य माणसाला जें जमत नाहीं तें हे करून दाखवतात. सर्वसाधारण माणसाला जें करण्याची कल्पनाहि येत नाहीं, तें यांच्या आयुष्यांत प्रत्यक्ष घडत राहिलेलें असतें. म्हणूनच ते सामान्य माणसापेक्षां वेगळे, निराळे—थोर, मोठे.

डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर हे फार मोठे विद्वान आहेत, जाडे पंडित आहेत. ख्रिश्चन लोकांचा धर्मग्रंथ 'बायबल'. त्यासंबंधीं त्यांनीं मोठमोठीं पुस्तकें लिहिलीं आहेत. त्याविषयीं नवे शोध लावले आहेत. ते उत्तम व्याख्याते आहेत, तसेंच ते मोठे संगीत जाणणारेहि आहेत. 'ऑर्गन' किंवा पायपेटी हें वाद्य वाजविण्यांत तर त्यांची जगभर ख्याति आहे.

पण तरी इथे आपण जें त्यांचें चरित्र पाहतों आहोंत तें वेगळ्याच कारणासाठीं. ते आणखी पुष्कळ आहेत; पण ते अति थोर सेवावीर आहेत. मनुष्य जातीचे आदर्श सेवक आहेत. यासाठींच त्यांचें चरित्र आपल्याला पाहायचें आहे.

● ● ●

डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर यांचा जन्म १८७५ सालीं १४ जानेवारीला झाला. जर्मनीमधील अप्पर अल्सेस परगण्यांतील केसरबर्ग हें त्यांचें जन्मगांव. लुई श्वाइत्झर हे येथील धर्माधिकारी होते. त्यांचा आल्बर्ट हा दुसरा मुलगा. त्याचे आजोबा एक शाळामास्तर होते; आणि पायपेटीवादक म्हणूनहि ते तिथे काम करीत असत. आईकडूनहि आल्बर्टला धार्मिक वळणाचेंच बाळकडु मिळालेलें होतें. कारण तीहि एका धर्मोपदेशकाचीच मुलगी होती.

आल्बर्ट सहा महिन्यांचा असतांनाच त्यांच्या वडिलांची गुनबॅश या गांवांत धर्मोपदेशक म्हणून नेमणूक झाली. हें नवें

गांव राहणीच्या दृष्टीनें चांगलें होतें. तिथे हें कुटुंब सुखी झालें. आल्बर्टला एक भाऊ आणि तीन बहिणी होत्या. त्यामुळें घरहि भरल्यासारखें होतें.

आल्बर्ट शाळेंत जाऊं लागला. वास्तविक तो धर्माधिकाऱ्याचा मुलगा. त्यामुळें त्याची प्रतिष्ठा मोठी. पण त्याला वाटे कीं आपल्या शेतकरी शाळुसोबत्यांनीं आपल्याला त्यांच्यांतलाच समजावें. तो पोषाखसुद्धां शहरी करीत नसे. एकदां त्याला नवा ओव्हरकोट आणला होता. वास्तविक लहान मुलांना नवे कपडे म्हणजे केवढा आनंद ! परंतु छोटचा आल्बर्टनें तो नवा कोट घालण्याचेंच नाकारलें. इतकेंच काय, एकदां तर त्यानें आपले किमती हातमोजे मुद्दाम हरवले ! हेतु हा कीं, ते घालायला लागूं नयेत.

आल्बर्ट असा वागे तो खटचाळपणा म्हणून नव्हे. त्याच्या लहानशा मूर्तींतलें मनच मोठें झालेलें होतें म्हणून. तो शेतकऱ्यांचीं मुलें पाही. त्यांची गरिबी, त्यांचे किडमिडीत देह बघून आल्बर्टच्या पोटांत कालवूं लागे. त्याला वाटे, हे असे दारिद्र्यांत पिचतात, मग आपण तरी कशी छानछोक करावी ? पोरवयांत केवढा हा थोर विचार ! पण मोठ्या माणसांचें असेंच असतें. रामदासस्वामी आठ-दहा वर्षांचे पोर होते तेव्हांच ते ‘ विश्वाची चिंता ’ करूं लागले होते.

मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात म्हणतात. तशीं मोठ्यांचीं मनें खेळांतहि दिसतात. शककर्ता शालीवाहन राजा लहानपणीं मातीचें सैन्य करून खेळे.

आल्बर्टचे छोटे छोटे मित्र होते. त्यांच्याबरोबर तो रानांत जाई. पांखरें मारण्यांत त्यांना फार गंमत वाटे. पण लहानग्या आल्बर्टचें काळीज कळवळे. तो त्यांना रोखी. पांखरें अगोदरच उडून जावींत म्हणून टाळी वाजवी. मग त्याचे मित्र त्याच्यावर रागावत, चिडत. त्याला पुळचट-वुळचट म्हणून खिजवीत. पण आल्बर्टला आपण करतों तेंच बरोबर अशी खात्री वाटे. त्यामुळें



तो त्यांच्याकडे लक्ष देत नसे. कित्येकदां याबाबतींत शिक्षकांचाहि राग त्याला ओढवून घ्यावा लागे. पण तो म्हणे, 'कां मारायचें त्या गरीब मुक्या जिवांना!'

पण मनाची इतकी तयारी व्हायलाहि थोडा काळ लागतोच. त्यावेळची एक हकीकत स्वतः आल्बर्ट श्वाइत्झरनींच सांगितली आहे. '...एकदां असाच मित्रांबरोबर पक्षी मारण्यासाठीं गेलों होतों. माझ्या मनांत त्या मुक्या प्राण्यांना मारावें असें नव्हतें. परंतु तसें बोलून दाखविण्याची लाज वाटत होती. इतक्यांत चर्चची–ख्रिस्ती प्रार्थनामंदिराची–घंटा वाजली. पक्ष्यांच्या गीतांत तिचे तालबद्ध स्वर मिसळलेले मला ऐकूं आले. आणखी अर्ध्या घंट्यानें प्रार्थनेची वेळ होत होती. मला वाटलें आपण ऐकलें –तें जणूं देवानेंच आपल्याला हांकारलें. माझ्या हातांतली गलोल मी दूर भिरकावून दिली. पांखरांना सावध करून मित्राच्या गलोलीच्या टप्प्याबाहेर पिटाळून लावलें. आणि शक्य

तितक्या जोरानें घराकडे धूम ठोकली. अजूनहि वसंत ऋतूंतील स्वच्छ आकाशांत जेव्हां जेव्हां प्रार्थनामंदिराच्या घंटेचे निनाद घुमतात तेव्हां मला याची आठवण होते. 'तूं हत्या करूं नकोस–' ही ख्रिस्ताची आज्ञाच जणूं मला त्यांतून आजहि ऐकूं येते. त्या दिवसापासून माझ्या मित्रांच्या भीती-पासून मुक्त होण्याचा धीर माझ्या ठिकाणीं आला. जिथे एखादी गोष्ट माझ्या मनावर खोलवर ठसली तिथे मी इतरांच्या मतांची पर्वा करीनासों झालों.'

श्वाइत्झर असे वाढत होते. वाढतां वाढतां शिकत होते. शिकतां शिकतां परिस्थितीशीं झुंजतहि होते.

## विचार उगवला

आल्बर्ट श्वाइत्झर यांचे पूर्वसंस्कार फार वरच्या दर्जाचे असले पाहिजेत. एरवीं सर्वसामान्य माणसांच्या मनांत जे थोर विचार येत नाहींत ते त्यांच्या मनांत कसे येतील ? मोठेपणीं त्यांनीं फार मोठी सेवा पत्करली. पण त्याचें बीं लहानपणींच त्यांच्या मनांत रुजलें होतें. त्याबद्दलची हकीकत त्यांच्याच तोंडून ऐकूं.

पूर्व आफ्रिकेंत जाऊन तेथील निग्रोंची सेवा करण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यासाठीं डॉक्टरीची परीक्षा त्यांनीं दिली. तें ज्ञान त्यांनीं मोठ्या कष्टांनीं मिळविलें. आफ्रिकेंत डॉक्टर म्हणून जाण्याची ही त्यांची योजना त्यांच्या मनांत कितीतरी अगोदर-पासून घोळत होती. तरुणपणांतच मनांत शिजत होती.

ते स्वत: सांगतात : 'हो जी योजना मी ठरविली ती तशी नवीन नव्हती. माझ्या विद्यार्थी-वयांतच ती माझ्या मनांत रुजली होती. माझ्या आंवतींभोंवतीं कितीतरी

माणसें काळजीनें खंगलेलीं व दु:खानें झुरत असलेलीं मी पाहात होतों. त्या वेळच्या परिस्थितींत मी त्यांच्या मानानें फार सुखी होतों, आनंदी जिणें जगत होतों. त्याच दिवसांत माझ्या मनांत येऊं लागलें कीं हीं इतर बिचारी माणसें दु:खीकष्टी असतांना आपल्याला सुखानें जगण्याचा हक्क नाहीं. शाळेंत असतांना कधींमधीं कोणा सोबत्याच्या घरीं जाण्याचा प्रसंग येई. त्यावेळीं त्यांच्यापैकीं कांहींच्या घरची केविलवाणी स्थिति माझ्या दृष्टीला पडून माझें काळीज उलून जाई. त्यांच्या घरच्या परिस्थितीशीं तुलना करून आपल्या घरची स्थिति किती उत्तम प्रकारची आहे तें मनांत येई. पुढें विद्यापीठांत शिकत असतांना मनासारखा अभ्यास करावा, शास्त्र व कला यांत प्रयोगानें कांहीं प्रगतीहि करावीं आणि त्याचा भरपूर आनंद लुटावा अशी अनुकूलता मला होती. परंतु ती अनुकूलता, तें सुखहि मला खुपूं लागलें. माझ्या मनांत त्यावेळीं विचार येई तो, ज्यांना आर्थिक दु:स्थितीमुळें किंवा शरिराच्या दुबळेपणामुळें हा आनंद मिळवितां येत नाहीं त्यांच्याबद्दल.

त्या दिवसांतच एका प्रसन्न पहांटे माझ्या मनांत एक विचार उगवला. १८९६ तली ही गोष्ट आहे. उन्हाळ्याच्या सुटीचे दिवस होते. गुनबॅशलाच मी होतों.पहांटे जागा झालों. आणि एक विचार माझ्या मनांत उदय पावला—आपल्याला मिळणारें हें सुख आपण सुखासुखीं भोगतां कामा नये; त्याच्या मोबदल्यांत आपण कांहींतरी दिलें पाहिजे. माझें विचारचक्र सुरू झालें. बाहेर पक्षी गात होते. मी शांत मनानें विचार करीत होतों. अखेर अंथरुणांतून उठण्यापूर्वीं माझा एक विचार पक्का झाला—वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंतच फक्त आपल्याला असें जगतां येईल. तोंपर्यंतच शास्त्र व कला यांच्या आनंदांत

रमलेलें चालेल. त्यानंतर म्हणजे वयाच्या तिसाव्या वर्षानंतर मात्र आपण मानवजातीच्या प्रत्यक्ष सेवेलाच वाहून घेतलें पाहिजे.

> " जो कोणी आपली कातडी बचावून जगण्याची खटपट करील तो जीवनाला मुकेल; आणि जो कोणी माझ्यासाठीं व माझ्या शिकवणीसाठीं आपले प्राण खर्ची घालील तोच खराखुरा जगेल. "

येशू ख्रिस्ताच्या या वचनांत काय अर्थ दडलेला आहे तो हुडकून काढण्याचा मी यापूर्वी अनेकदां प्रयत्न केला होता. आतां मला त्याचें उत्तर मिळालें. बाहेरून मिळणाऱ्या सुखाप्रमाणेंच मला आतां आंतूनहि सुख प्राप्त झालें.'

" **आपुल्या पुरुषार्थ वैभवें । बहुतांस सुखी करावें ॥** "— असें श्री रामदासस्वामींनीं सांगितलें आहे. जगांत सत्य जसें एक आहे, तसे खऱ्या सेवेचे रस्तेहि एकच आहेत. मग ते कोणीहि सांगितलेले असोत.

आपल्यापाशीं शक्ति-बुद्धि आहे. आपल्याला अनुकूलता आहे. त्याच्या साह्यानें लोकांची सेवा करायची इतकें श्वाइत्झर यांचें ठरलें; तरी पण तें अस्पष्ट होतें. त्याला आकारउकार आलेला नव्हता. पण तोहि मिळण्याचा योग अगदीं आकस्मिक रीतीनें आला.

आल्बर्ट श्वाइत्झर यांचें एवढें नक्की ठरलें होतें कीं, आपल्याला कांहींतरी प्रत्यक्ष मानव-सेवा करावयाची. प्रथम त्यांच्या मनांत विचार आला तो युरोपांतच कुठेतरी कांहीं सेवाकाम करण्याचा. निराश्रित व दुर्लक्षित अशा मुलांचा सांभाळ करण्याचें काम त्यांनीं सुरू केलें. अशीं मुलें हुडकून, त्यांना आसरा देऊन, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करावी. व पुढें तीं मुलें मार्गी लागल्यावर त्यांनीं इतर अशाच मुलांनाहि

याप्रमाणें मदत करावी. अशी श्वाइत्झरची ही योजना होती. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. त्यांची ही सेवा स्वीकारायला कोणती संस्था तयारच होईना.

त्यानंतर त्यांनीं भटक्या गरिबांना व तुरुंगांतून सुटून आलेल्या लोकांना आधार देण्याचा विचार केला. त्या दृष्टीनें कांहीं सहकाऱ्यांच्या मदतीनें त्यांनीं खटपटहि केली. परंतु अनुभव असा आला कीं, या लोकांत खरोखरी मदत देण्याच्या लायकीचे फारच थोडे. आणि या लोकांसाठीं कांहीं परिणामकारक काम करावयाचें तर त्याला संस्थांचें पाठबळ हवें. त्यामुळें तोहि नाद त्यांना सोडून द्यावा लागला.

विद्यार्थी असतांनाच ते दुसऱ्या एका सेवा संस्थेचे सभासद झाले होते. ती संस्था विद्यार्थ्यांचीच होती. प्रत्येकाकडे कांहीं ठराविक गरीब कुटुंबें वांटून दिलेलीं असत. त्या कुटुंबांकडे जाऊन प्रत्येक आठवड्यांत त्या त्या विद्यार्थ्याला त्यांची वास्तपुस्त करावी लागे. त्या त्या कुटुंबासाठीं संस्थेकडून दिली जाणारी मदत त्या त्या कुटुंबांना पोहोंचवून, त्यांचा अहवाल संस्थेच्या कचेरीकडे या स्वयंसेवक विद्यार्थ्याला द्यावा लागे. शहरांतील चांगल्या स्थितींत असलेल्या कुटुंबांकडूनच ही मदत-पैसे इत्यादि—संस्थेकडे येई. हें काम या स्ट्रासबुर्ग शहरांत पिढ्यानपिढ्या चालू होतें. तेंच या विद्यार्थ्यांनींहि पुढें चालविलें होतें. या विद्यार्थी स्वयंसेवकांना वर्षांतून दोन वेळां या मदत देणाऱ्या कुटुंबांकडे जाऊन ‘ भिक्षांदेही ’ करावी लागे. अर्थातच श्वाइत्झरांच्यावरहि ही पाळी येई. त्या बाबतींतला आपला गमतीदार अनुभव त्यांनीं सांगितला आहे.

> “ मी स्वभावानें लाजरा व मंडळींत गेलों कीं भांबावून जाणारा. त्यामुळें मला हे ‘ भिक्षांदेही ’चे प्रसंग म्हणजे मोठेंच दिव्य असे. पुढील आयुष्यांत मला ( लोकसेवेसाठीं ) जी ‘ भिक्षांदेही ’ करावी लागली तिचा हा


प्राथमिक अभ्यास होता, पण त्यांतहि मी अगदींच कुचकामाचा ठरलों होतों ! "

असे बरेवाईट अनुभव ते घेत होते. सेवेच्या प्रामाणिक इच्छेनें व तळमळीनें आल्बर्ट श्वाइत्झर धडपडत होते. ते आपलें कार्यक्षेत्र हुडकण्याच्या खटपटींत होते. त्यांना मुख्यतः हवें होतें तें स्वतः एकटयानें स्वतंत्रपणें करतां येईल असें काम. बारभाईचा कारभार त्यांच्या निःस्पृह स्वभावाला मानवण्यासारखा नव्हता.

## 'हांक' पोहोंचली

एक दिवस मोठा विलक्षण योगायोग आला. १९०४ मध्यें एक दिवस श्वाइत्झरच्या लिहिण्याच्या मेजावर एक हिरव्या रंगाचें मासिक पडलें होतें. त्यांत पॅरिस मिशनरी संस्थेचा अहवाल दरमहा येत असे. या संस्थेमार्फत आफ्रिकेंतील फ्रेंच कांगो वसाहतींत काम चालत असे. 'त्या ठिकाणीं काम करण्यासाठीं माणसांची फार वाण असून, ख्रिस्ताच्या हांकेला ओ देऊन जे येतील त्यांची संस्था वाट पाहात आहे' असें त्या मासिकांतील लेखांत म्हटलें होतें. श्वाइत्झरच्या अंतःकरणांत ती 'हांक' त्याक्षणींच जाऊन पोहोंचली.

१३ ऑक्टोबर १९०५. हा दिवस आल्बर्ट श्वाइत्झरच्या आयुष्यांत सर्वांत महत्त्वाचा. त्या दिवशीं त्यांनीं स्वतःच्या आयुष्याबद्दलची फार मोटी गोष्ट ठरविली. आफ्रिकेच्या जंगलांत जाऊन तिथल्या आदिवासींची सेवा करावयाची. हें ठरविणें सोपें नव्हतें. नव्हे, फारच कठीण होतें. आपल्याला वाटेल, त्यांत काय आहे ? युरोपांत राहायचें त्याच्याऐवजीं आफ्रिकेंत जाऊन राहायचें. छे ! छे ! इतकी साधी नव्हती ही घटना.




आफ्रिकेंत जायचें म्हणजे काय काय करायचें ? तिथल्या आदिवासींची सेवा करायची ती कां व कशी ?

आफ्रिकेंत जायचें म्हणजे आपल्या हातां-तला चालू कामधंदा सोडून द्यायचा. दरमहा मिळणाऱ्या पगारावर पाणी सोडायचें. आपल्या आवडत्या संगीताकडे पाठ फिरवायची. देव-विज्ञान (धर्मशास्त्र) हा अभ्यासाचा विषय, तो विसरून जायचा. आणि डोकें घालायचें कशांत तर वैद्यकींत, डॉक्टरी शिकण्यांत. उभ्या हयातींत ज्या गोष्टीचा कधीं संबंध आला नाहीं, आपल्या वाडवडिलांपैकीं कोणालाहि ज्या विषयांतली कांहीं माहिती नाहीं, असा विषय शिकायचा. त्याचा अभ्यास करायचा. त्याची परीक्षा देऊन पास व्हायचें. – अन् जवळचें इतकें सगळें सोडून, जिवाचा एवढा मोठा आटापिटा करून मिळवा-यचें काय ? तर, हजारों मैल दूर जाऊन परकी, अनोळखी लोकांची सेवा. हे लोक ना त्याच्या धर्माचे ना त्याच्या देशाचे. कै. ठक्करबाप्पांनीं* आदिवासींची अमाप सेवा केली. पण ते आदिवासी निदान बाप्पांच्या धर्माचे होते. त्यांच्या देशांतले होते. त्यांच्याच रक्ताचे नि संस्कृतीचे होते. पण इथे तर तसें कांहींहि नव्हतें. आणि अशा परकी लोकांची सेवा करण्यासाठीं स्वतःचा देश सोडून जायचें असें आल्बर्ट श्वारत्झरनीं ठरविलें. त्यावेळीं ते केवळ तीस वर्षांचे तरुण होते. संसारांतलीं सुखें त्यांनीं अजून चाखलींहि नव्हतीं. पण सेवा म्हणजे कांहीं

---

* ठक्करबाप्पांचें चरित्र या मालेंतूनच प्रसिद्ध झालें आहे. वाचा : 'लोकसेवक ठक्करबाप्पा'

'लेंकुराच्या गोष्टी" नाहींत. तीहि भक्तिप्रमाणेंच "सुळावरची पोळी" आहे. त्यागाच्या सुळावर स्वतःच्या अंगाच्या चिंध्या कराव्यात तेव्हांच तिचें दर्शन घडतें. नुसता गटारांत खराटा फिरवला; सार्वजनिक सडकेच्या बांधणींत दोन घमेलीं माती ओतली; अगर खूप मोठ्यानें ओरडून 'भाषण' केलें म्हणजे नाहीं सेवा घडत. त्यासाठीं पहिल्यानें स्वतःजवळचें स्वार्थाचें गांठोडें पुष्कळसें हलकें करावें लागतें.

तरीपण श्वाइत्झरचा निश्चयच झाला होता. त्यांचें तसें ठाम ठरलें होतें. त्यांना कितीजणांनीं विरोध केला. कितींनीं त्यांची हेटाळणी केली. कित्येकांनीं त्यांना हा 'निव्वळ मूर्ख-पणा' आहे म्हणून हिणवलें. पण, श्वाइत्झरनीं या सगळ्या गोष्टींचा विचार पूर्वींच केलेला होता. आतांपर्यंत ते प्रेम-धर्माचीं तत्त्वें वाचीत होते, शिकवीत होते. परीक्षेंत त्याविषयीं उत्तरें लिहून ते पास झाले होते. पण आतां त्या तत्त्वाचें प्रत्यक्ष आचरण करावयाचें होतें. त्याप्रमाणें व्यवहारांत वागावयाचें होतें. ही फारच मोठी कठीण परीक्षा होती.—तीहि ते उतरले. उत्तम रीतीनें पसार झाले. १९०६ मध्यें त्यांनीं ट्रास्टबुर्गच्या वैद्यकीय कॉलेजांत विद्यार्थी म्हणून नांव दाखल केलें. एक फार प्रसिद्ध अशा कॉलेजचा मुख्याध्यापक—प्रिन्सिपॉल—प्राचार्य केवळ लोकसेवेच्या बुद्धीनें पुन्हां विद्यार्थी बनला.

पुढें त्यांचें हें वैद्यकीचें शिक्षण सतत सात वर्षें चालू होतें. केवढा संयम ! अनेक वर्षें शाळेंत मास्तर म्हणून वाग-लेल्या माणसाला शेतांत नांगर धरायला लावलें तर किती अवघड वाटेल त्याला. तसेंच हें होतें. पण श्वाइत्झरनीं तेंहि चिकाटीनें सहन केलें. तरीपण तीं सात वर्षें त्यांना फार कठीण गेलीं. मनावर ताबा म्हणजे काय याची प्रचीती यांत फार चांगली आली.

तथापि या सात वर्षांत ते केवळ वैद्यकीचा अभ्यास करूनच स्वस्थ बसले नव्हते. या काळांत त्यांनीं खूप पुस्तकें लिहिलीं. पायपेटी (इंग्रजी) तयार करण्याचें तंत्र पुरेपूर हस्तगत केलें. आणि पायपेटीचे अनेक जलसेहि केले. परंतु त्यांची आपल्या उद्दिष्टावरची दृष्टि मात्र क्षणभरसुद्धां ढळली नव्हती. त्यांनीं लिहिलेलीं पुस्तकें चांगलीं खपूं लागलीं. त्यांच्या जलशांना चांगलें उत्पन्न होऊं लागलें. आणि यांतून एव्हांपासूनच आपल्या आफ्रिकेंतील सेवाकार्यासाठीं पैसे मागें टाकण्यास त्यांनीं सुरुवात केली.

पूर्व आफ्रिकेंतील कांगो वसाहतीमध्यें लॅम्बेरेने म्हणून गांव आहे. हें ठिकाण श्वाइत्झरनीं आपल्या सेवा-केंद्रासाठीं पसंत केलें. ओगोवी नदीच्या कांठीं हें गांव होतें. तेथें त्यांना एक मोठें रुग्णालय ( हॉस्पिटल ) उभारावयाचें होतें. तेथें जाऊन तेथील आदिवासी निग्रोंना औषधोपचार करण्यांत पुष्कळच अडचणी होत्या. पैशापासून परवानगीपर्यंत त्या अनेक प्रकारच्या होत्या. तरी श्वाइत्झरनीं अडचणींचे ते सारे डोंगर हळूहळू ओलांडले.

## महत्कार्यासाठीं प्रयाण

१९१३ चा तो फेब्रुवारी महिना होता. महायुद्धाचे वारे युरोपवर जोरानें घोंघावत होते. पुढें काय होणार याची अटकळ श्वाइत्झरना येऊन चुकली होती. तरीपण ते आपल्या ठरविलेल्या उद्योगाला शांतपणानें लागले. सामानसुमानाच्या सत्तर पेट्या पुढें रवाना झाल्या. आणि डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर आपल्या पत्नीसह आपल्या सेवाक्षेत्राकडे निघाले. १९१३ मधला तो ' गुडफ्रायडे 'चा दिवस होता. हा येशू ख्रिस्ताच्या पुण्यतिथीचा दिवस. त्या दिवशींच श्वाइत्झरनीं आपल्या मानवसेवेच्या महत्कार्यासाठीं प्रयाण केलें.

' जसा यक्ष तसा बळी ' अशी म्हण आहे. तसेंच जशी सेवा तसा त्याग असावा लागतो. यज्ञाच्या अग्नींत जशी व जेवढी आहुती द्यावी तशी व तेवढी ज्वाळा वर उफाळते. मानवजातीची सेवा म्हणजे सोपें काम नाहीं. लहानसहान गोष्ट नाहीं. संतांनीं सर्वस्वाचा न्यास केला, म्हणजे संन्यास घेतला किंवा सर्वस्वावर पाणी सोडलें; तेव्हां त्यांना मानवाची महनीय सेवा करतां आली. श्वाइत्झरनाहि या सेवेसाठीं दोन फार मोठ्या गोष्टी सोडाव्या लागल्या. एक, त्यांचें अत्यंत आवडतें संगीत-पियानोवादन; आणि दुसरी, त्यांचा आवडता अभ्यासाचा विषय तत्त्वज्ञान-देवविज्ञान. लहानपणापासून संगीताकडे त्यांचा अतिशय ओढा. त्यांत ते खरेखुरे रंगून गेलेले. त्याच्यापुढें ते तहानभूकहि विसरायचे. तो त्यांच्या जीवींचा विसांवा. आणि देवविज्ञानांत तर त्यांनीं केवढी कीर्ति मिळविलेली. त्याच्यावरच त्यांची बुद्धि जगायची. तरीपण त्यांना त्या दोन्ही गोष्टी सोडाव्या लागल्या. ध्येयवादी माणसांना हें करावेंच लागतें.

कशासाठीं काय सोडायचें हें ज्याला बरोबर कळतें तोच खरा ध्येयवादी. तिथेंच त्याचा खरा कस लागत असतो. '—मी आफ्रिकेंत धर्मोपदेश करणार नाहीं. फक्त वैद्यकीय मदतीचें काम करीन ' असें वचन त्यांनीं दिलें होतें. आणि पियानोची पेटी उघडून पाहायलाहि त्यांना कित्येक दिवस सवड मिळाली नाहीं. लोकमान्य टिळक नसत का म्हणत, ' देशाच्या स्वातंत्र्याचा लढा मला लढायचा नसता तर मी गणिताचा प्राध्यापक होऊन राहिलों असतों.' गणित हा लोकमान्यांचा आवडता विषय. पण देशाच्या सेवेसाठीं त्यांनीं तो सोडून दिला. ध्येयापुढें आवड बाजूला सारावी लागते. आवड म्हणजे तरी सुखच. ध्येयाचें सख्यत्व करायचें तर सुखाची संगती सोडावीच लागते. सन्त तुळसीदासांनीं प्राणापलीकडे प्रेम असलेली पत्नी देवासाठीं सोडली. देवाच्या सेवेसाठीं पत्नीचा त्याग केला. आणि धर्माच्या सेवेसाठीं संभाजी महाराजांनीं तर आपले पंचप्राण ओवाळून टाकले.

डॉ. आल्बर्ट श्वाइत्झरनीं ठरविलेलें ध्येयहि फार मोठें होतें. आणि त्या दृष्टीनें आतां ते या ध्येयाकडे जाण्याच्या रणमैदानावरच प्रत्यक्ष येऊन ठेपले होते.

पूर्व आफ्रिकेंतला हा प्रदेश सर्वस्वीं मागासलेला होता. तेथें सडका नव्हत्या, मोटारी नव्हत्या कीं आगगाड्याहि नव्हत्या. रुग्णालयासाठीं (हॉस्पिटलसाठीं) ठरविण्यांत आलेली जागा ज्या नदीकांठीं होती तींतून होड्यांनीं वाहतूक होई. तीच काय ती वाहनाची सोय. प्रवाहाच्या खालीं व वर दोन-दोनशें मैलपर्यंत कोठेंहि वैद्यकीय मदत मिळण्याची सोय नव्हती. त्या घनदाट जंगलांत राहणारे आदिवासी म्हणजे अज्ञानांत धड-पडणारे रानटी जीव. त्यांना काम करण्याची पद्धत नी शिस्त कुठून माहीत असणार ? त्यामुळें रुग्णालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणीं त्यांची मदत मिळण्याची मुळींसुद्धां शक्यता नव्हती. ती मिळूनहि फारसा उपयोग नव्हता. परंतु या अडचणी श्वाइ-त्झरना भेडसावूं शकत नव्हत्या. आफ्रिकेंतली भाजून काढणारी भयंकर उष्णता, साधनसामुग्रीचा अभाव, कशाकशाचीच त्यांना पर्वा नव्हती.

ते एप्रिल महिन्यांत आफ्रिकेच्या अरण्यांत येऊन पोहों-चले. त्यांच्यासमोर साऱ्या अडचणीच होत्या. अनुकूलता होती ती फक्त त्यांच्या अफाट उत्साहाची व तीव्र तळमळीच्या सेवावृत्तीची.

श्वाइत्झर पतिपत्नींचें तेथील मिशनरींनीं चांगलें स्वागत केलें. त्यांना राहण्यासाठीं बरेंसें घरहि मिळालें. परंतु दवाखा-न्याची जागा म्हणून त्यांना एका जुनाट खोपटाचाच पहिल्यानें उपयोग करावा लागला. नव्या इमारती बांधणें आवश्यकच होतें. त्यासाठीं श्वाइत्झरनीं तिथलीं झाडें तोडलीं व जमीन साफ करून घेतली. तिथे झोपड्या कशा उभारावयाच्या याच्या योजना आंखल्या व स्वतःच्या हातांनीं त्या बांधायलाहि सुरुवात

केली. 'इस्पितळां'करितां म्हणून जें झोपडें मिळालें होतें, त्याचीच त्यांनीं प्रथम डागडुजी केली. त्याला रंगसफेती करून घेतली. तरीपण ती जागा फारच लहान पडत होती. पुढें इस्पितळासाठीं ( रुग्णालयासाठीं ) एक मोठी इमारत त्यांनीं बांधली. पण त्यालाहि इमारत म्हणण्यापेक्षां मोठी झोपडीच म्हणणें अधिक योग्य.

## कल्पनेपेक्षां महत्त्वाचें

पहिल्या दिवसापासूनच स्वाइत्झरना रोग्यांचा वेढा पडला. त्यांना त्यांच्या औषधांच्या व हत्यारांच्या पेट्या उघडायलाहि त्या बिचाऱ्यांनीं फुरसत दिली नाहीं. त्यांत हिंवतापापासून महारोगापर्यंत सर्व प्रकारचे रोग असलेले रोगी होते. ज्या रोग्यांवर शस्त्रक्रिया-ऑपरेशन-करायला हवें असेहि कित्येक रोगी येऊं लागले. अंतर्गळाच्या रोग्यांची तर फारच मोठी संख्या त्या भागांत होती. यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठीं कोणी डॉक्टर आसपास न मिळाला तर ?–किती असंख्य रोगी मरणाच्या दाढेंत जात असतील देव जाणे ! त्या अज्ञानी, दुःखी जीवांचीं दुःखें प्रत्यक्ष पाहून आपण ठरविलेलें काम किती महत्त्वाचें होतें हें स्वाइत्झरांच्या लक्षांत आलें. त्यांना आपल्या निर्णयाबद्दल आनंद वाटला. त्यांनीं लिहिलें आहे :

> "मी पूर्वीं कल्पना केली होती त्यापेक्षां कितीतरी अधिक पटींनीं येथले आदिवासी रोगराईनीं कण्हत होते; हाल भोगीत होते. पहिल्या पहिल्या आठवड्यांतच मला हा अनुभव येऊन चुकला."

सुरुवातीला भाषेचीहि अडचण होती. नीग्रो आदिवासींचें बोलणें डॉक्टरना व डॉक्टरांचें म्हणणें निग्रोंना समजावून सांगण्याची गरज होती. त्यासाठीं दोन्ही भाषा समजणारे



दुभाष्ये लागत. पहिल्या–पहिल्यानें तेहि मिळत ना. दवाखान्याच्या व इतर कामासाठीं मदतनीस मिळत नसत. त्यामुळें डॉक्टरांच्या कामांत खूपच अडथळे येत. परंतु डॉक्टरांच्या पत्नींनीं ही अडचण अगोदरच ओळखली होती. त्यांनीं परिचारिकेचें काम घरून निघण्यापूर्वींच शिकून घेतलें होतें. त्या शिक्षणाचा डॉक्टरांना आतां फार उपयोग झाला. त्यांना एक मदतनीसहि मिळाला.


दवाखाना पहिल्या दिवसापासूनच चालू झाला. रुग्णालयाची नवी झोपडी उभी राहिली. कांहीं महिन्यांतच दरदिवशीं ४०-४० रोग्यांवर उपचार होऊं लागले. पहिल्या नऊ महिन्यांत जवळजवळ २००० रोग्यांना डॉक्टरांच्या या सेवेचा फायदा मिळाला. तरीहि अडचणी होत्याच. शस्त्रक्रियेसाठीं आधुनिक साधनांनीं सज्ज असें रुग्णालय तिथे कुठून येणार ! म्हणून

डॉक्टर आपल्या घरासमोर उघड्यावरच शस्त्रक्रिया उरकीत. त्यांची पत्नी मदतनीस म्हणून काम करी.

औषधोपचारासाठीं येणाऱ्या रोग्यांशीं वागायचें कसें हीहि अडचणच होती. एका रोग्याबरोबर त्याचे अनेक इष्टमित्र व नातेवाईक असत. त्या सर्वांची राहण्याजेवण्याचीहि सोय डॉक्टर-नाच करावी लागे. बरें, या गरीब माणसांकडून फी तरी कसली घेणार ? तरीपण फुकटांत मिळालेल्या गोष्टीची किंमत कोणाला वाटत नाहीं. हा मनुष्यस्वभाव डॉक्टरना माहीत होता. त्यामुळें त्यांनीं अशी पद्धत पाडली कीं कोणी आदिवासी रोगी बरा होऊन घरीं परत चालला कीं त्यानें रुग्णालयाच्या मदतीकरितां कांहींतरी द्यावें. मग केळीं, कोबडचा, अंडीं कांहीं दिलें तरी चालेल. पैसे देणें कोणाला शक्य असलें तर तेहि द्यावेत. अशा रीतीनें 'फी' म्हणून मिळणाऱ्या केळयांचा किंवा पैशाचा उपयोगहि पुन्हां इतर आदिवासी रोग्यांकरितांच व्हायचा. ज्यांच्याजवळचा भाकरतुकडा संपला असेल, त्यांना या मिळणाऱ्या 'फी' मधून पुरवठा होई. केळीं कमी पडलीं तर मिळालेल्या 'फी' च्या पैशांतून तांदूळ विकत घेऊन त्यांना दिला जाई.

पण कांहीं आदिवासी रोगी असे असत कीं ज्यांना खरोखरीच रानदांडगे म्हणावें लागे. असे रानदांडगे आजारांतून बरे होऊन परत निघाले म्हणजे डॉक्टरांकडे येत. त्यांना 'बक्षिशी' हवी असायची. मग तेच उलट डॉक्टरांकडे अशा 'बक्षिशी'ची मागणी करीत. कारण त्यांच्या दृष्टीनें डॉक्टर त्यांचे आता मित्र झालेले असत. 'मित्रा' कडून 'बक्षिशी' उपटायला हवीच !

१९१३ च्या एप्रिलमध्यें डॉ. श्वाइत्झर आफ्रिकेंतल्या त्या घोर अरण्यांत आले. आणि १९१४ च्या जुलैमध्यें म्हणजे सुमारें वर्ष-सव्वा वर्षांत त्यांनीं तेथें मोठें रुग्णालय उभारलें.



श्वाइत्झरना आपल्या आवडत्या पुस्तकांकडे पाह्यला फुरसत सापडेनाशी झाली. पियानोवर बोटे फिरवून मनाला विरंगुळा आणायलाहि वेळ मिळेनासा झाला. त्यांचें काम आणि करमणूक एकच बनली—रुग्णसेवा.

मोठमोठ्या इमारती तिथे तयार झाल्या. त्यांत सर्व आधुनिक औषधें, उपकरणें व हत्यारें आलीं. शस्त्रक्रिया करण्याच्या बाबतींत आतां कसली अडचण उरली नाहीं. रोगांनीं जर्जर झालेल्या, जिवाला कंटाळलेल्या असंख्य रोग्यांचा लोंढा लॅम्बेरेनेच्या रुग्णालयाकडे रात्रंदिवस वाहूं लागला. त्या सगळ्यांची काळजी घेण्याइतकें रुग्णालय सुसज्ज झालें. डॉक्टर तर सदैव तत्पर होतेच. अशा रीतीनें मानवसेवेचें प्रत्यक्ष कार्य डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर तेथें करूं लागले.

परंतु लवकरच एक फार मोठें संकट येऊन धडकलें. दुसरें महायुद्ध सुरू झालें. जर्मनी व फ्रान्स एकमेकांसमोर शत्रू म्हणून उभीं ठाकलीं. डॉ. श्वाइत्झर व त्यांच्या पत्नी हीं जर्मन नागरिक होतीं. कांगो वसाहत ही फ्रेंच सत्तेखालीं होती. त्यामुळें युद्धांतल्या कायद्याप्रमाणें तीं शत्रुपक्षाचीं ठरलीं. लगेच त्यांना घरांतच स्थानबद्ध करण्यांत आलें. घराबाहेर कोणाशींहि संबंध

ठेवण्यास बंदी करण्यांत आली. त्यांच्यावर सक्त पहारा बसला. अर्थातच त्यांची रुग्णासेवा बंद पडली. हा प्रकार बरेच दिवस चालू होता. परंतु तेथें त्याबाबतींत कोणीच कांहीं करूं शकत नव्हता. अखेर युरोपांत ही बातमी जाऊन पोहोंचली. त्यांच्या मित्रांना समजली. वायडर हा त्यांचा मित्र फ्रान्समध्यें होता. त्यांनीं त्याबाबतींत फ्रेंच सरकारकडे जोराची तक्रार केली. त्याचा परिणाम होऊन डॉक्टरांना रोग्यांना औषधोपचार करण्याची परवानगी देण्यांत आली. बाकी ते तसे फ्रेंच सरकारचे कैदीच राहिले.

## महायुद्धाचें संकट

इकडे महायुद्ध भडकतच होतें. १९१७ मध्यें फ्रेंच सरकारनें शत्रु-राष्ट्रांतल्या नागरिकांभोंवतीं कायद्याचे फांस अधिकच आवळले. श्वाइत्झर पतिपत्नींनाहि त्याचा तडाखा बसला. त्या दोघांना आफ्रिकेंतून त्यांच्या सेवास्थानांतून उचलण्यांत आलें. आणि फ्रान्समध्येंच एका स्थानबद्धांच्या–कैद्यांच्या छावणींत अडकवून ठेवलें. लॅम्बेरेनेंहून निघतांना त्यांना फक्त कांहीं थोडच्या दिवसांचाच वेळ दिलेला होता. तेवढ्या वेळांत एवढ्या प्रचंड व्यापाची आवराआवर त्यांना करावी लागली ! आणि तरीहि निघण्याच्या आधीं दोन दिवस त्यांनीं एक शस्त्रक्रिया केलीच– एका निग्रोला जीवदान दिलें.

फ्रान्सला आणतांना बोटींत त्यांना कोणाशीं बोलायचीहि बंदी होती. कारण फ्रेंच सरकारच्या दृष्टीनें ते शत्रुपक्षाचे होते. ज्या माणसानें परकी निग्रोंच्यासाठीं स्वदेश सोडला. दुसऱ्यांच्या सुखासाठीं स्वतःच्या सुखाचा त्याग केला. तो हजारों माणसांचा, काळ्या-गोऱ्यांचा मित्र, मानवसेवक, तो थोर माणूस युद्धाच्या कायद्यानें एका राष्ट्राचा शत्रु ठरला, कैदी बनला.

तिथून पुढें त्यांना दोन तीन ठिकाणीं हलविण्यांत आलें. आणि पॅरिसमधील त्यांच्या मित्रांच्या चिकाटीच्या खटपटीमुळें त्यांना पुढें स्वदेशीं जाणेंहि शक्य झालें. परंतु या सर्व हालअपेष्टांत त्यांची प्रकृति चांगलीच ढांसळली. तरीपण त्यांनीं आपला अभ्यास चालूच ठेवला होता. श्वाइत्झरसारख्या माणसांना स्वस्थ बसणें म्हणजेच शिक्षा वाटते.

अखेर युद्ध थांबलें. त्यांना आतां फ्रान्समध्यें जाऊन आपल्या नातलगांच्या भेटी घेतां येणें शक्य झालें. त्यांना याच सुमारास मुलगीहि झाली. तरीपण १९२० पर्यंत त्यांना आपल्या सेवास्थानाकडे जावयाला परवानगी मिळाली नाहीं. १९२० मध्यें जेव्हां तशी परवानगी मिळाल्याचें कळलें तेव्हां त्यांना केवढा आनंद झाला! तरीपण त्यांना प्रत्यक्ष लॅम्बेरेनेंत पाऊल ठेवायला आणखी चार वर्षें लोटलीं.

लॅम्बेरेने त्यांची उत्कंठेनें वाट पाहात होतें. सात वर्षांनीं डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर पुन्हां त्या जमिनीवर पाऊल ठेवीत होते. यावेळीं त्यांची पत्नी मात्र त्यांच्याबरोबर नव्हती. आजारपणामुळें तिला मागेंच राहावें लागलें होतें.

लॅम्बेरेनेंत उतरल्यावर रुग्णालयाची अवस्था डॉक्टरनीं प्रथम पाहिली. जमीन बदलली नव्हती. हवामान पूर्वीचेंच होतें. रोगजर्जर झालेले आदिवासी पूर्वींचींच दुःखें भोगीत होते. त्यांत त्यांचा अपराध कांहीं नव्हता. त्यांना रोगापासून सोडविणाऱ्या डॉक्टरांना जबरदस्तीनें तेथून दूर नेण्यांत आलें होतें. जगांतलीं कोणतीं तरी राष्ट्रें आपसांत लढत होतीं. त्याबद्दल त्यांना ही शिक्षा मिळाली होती!

लॅम्बरेनेचें रुग्णालय विद्रूप होऊन पडलें होतें. छपरें कोसळलीं होतीं. भिंतीची पडझड झाली होती. पण तिथल्या काळ्या व गोऱ्या माणसांचें डॉक्टरांवरील प्रेम शाबूत होतें. त्या प्रेमानें डॉक्टरना पुन्हां कामाचें स्फुरण चढलें. पहिल्या दिवसापासूनच त्यांनीं कामाला हात घातला. मागच्याप्रमाणेंच त्यांनीं



कुऱ्हाड-करवत हातीं घेतली. पडलेल्या इमारती पुन्हां उभ्या करण्यासाठीं कंबर कसली.

पण नुसत्या इमारतींकडे लक्ष देऊन थोडेंच भागणार होतें ! आसपास शेकडों मैलांत डॉक्टर नव्हता. वैद्यकीय मदतीची सोय नव्हती. रोगराईनीं पछाडलेले शेकडों लोक डॉक्टरांच्या वाटेकडे डोळे लावून बसले होते. 'बडा डागदर' परत आल्याची दवंडी सगळीकडे पिटली गेली.

कांहीं दिवसांत युरोपांतून दोन नव्या परिचारिका आणि एक डॉक्टर श्वाइत्झरच्या दिमतीला आले. रोगी



वाढूं लागले. काम वाढूं लागले. खाद्यपदार्थ, इमारती, मदतनीस सगळ्याच गोष्टींची गरज वाढूं लागली. तेव्हां नव्या जागेवर प्रशस्त असें मोठें रुग्णालय उभारण्याची योजना स्वाइत्झरनीं आंखली. यासाठीं प्रथम तशा मोकळ्या जागेची गरज होती. आणि युरोपांतील मित्रांकडून पैशाची मदतहि मिळवायला हवी होती. आणि हें सर्व अतिशय तांतडीनें करायला हवें होतें.

:

## सत्य-संकल्पाचा दाता

डॉ. श्वाइत्झर हें जें सर्व करीत होते, करण्याची इच्छा धरीत होते, तें सारें लोकांसाठीं होतें—लोकांच्या सेवेकरितां होतें. निःस्वार्थीपणानें केलेली लोकसेवा हें सत् म्हणजे चांगलें काम आहे. तें सत्य म्हणजे जगांत कायम टिकून राहणारेंहि आहे. अशा सत् आणि 'सत्य संकल्पाचा दाता भगवान' असें आपल्याकडे म्हटलेलेंच आहे. श्वाइत्झरना भगवानच द्यायला उभा राहिला. त्यांच्या इच्छा पुऱ्या करायला उभा ठाकला. त्यांनीं ठरविलेल्या योजना पार पाडायला तो सिद्ध झाला. त्यानें आपले अनंत हात मदतीसाठीं पुढें केले. 'अनंत हस्तें कमलावरानें । देतां किती घेशिल दो करानें ।।' कमलावर म्हणजे भगवान विष्णु, प्रत्यक्ष देवच. तो आपल्या असंख्य हातांनीं द्यायला लागला; मग घेणारा दोन हाताचा माणूस किती घेणार! श्वाइत्झरना तोच अनुभव आला. हां हां म्हणतां त्यांची योजना अंग धरूं लागली.

एक टेकडी पसंत करून तेथील झाडी तोडण्यांत आली. जागा साफ झाली. कांहीं आठवड्यांतच तिथे इमारती उठूं लागल्या. सुमारें चाळीस इमारती उभ्या झाल्या. डॉक्टरांच्या राहण्याच्या घरापेक्षां रोग्यांसाठीं राहण्याची इमारत अधिक उंच होती. तोंपर्यंत रुग्णसेवेचें काम कांहीं बंद नव्हतें. जुन्या

झोपड्यांतून रोगी राहात होते. जुन्या जागीं औषधोपचार चालू होते.

२१ जून १९२७ ला ह्या नव्या रुग्णालयाची सर्व व्यवस्था अमलांत आली. डॉक्टरांनीं समाधानाचा निःश्वास टाकला. त्यांच्या धडपडीला आलेल्या यशाचा आनंद त्यांच्या रुंद चेहऱ्यावर झळकत होता. सगळ्यांना समाधान वाटत होतें.

या नव्यानें बांधलेल्या रुग्णालयाची सर्व व्यवस्था श्वाइत्झरनीं पद्धतशीर लावून दिली. सुमारें ६०० लोकांची राहण्याची सोय तेथें झाली. २५० रोगी या रुग्णालयांत आतां औषधोपचारासाठीं राहूं शकत होते.

तोंपर्यंत डॉक्टरना पुन्हां युरोपांत परत जाऊन येण्याची वेळ झाली. वास्तविक अनेक कामांसाठीं त्यांना यापूर्वींच तिकडे जाऊन यायला हवें होतें. तिकडेहि त्यांचे शेकडों चाहते व मित्र वाट पाहात होते.

डॉक्टर श्वाइत्झर युरोपांत परत आले. स्वागताचा, अभिनंदनाचा, गौरवाचा वर्षाव त्यांच्यावर होऊं लागला. कोणी पदव्या दिल्या. कोणी मेजवान्या दिल्या. कोणी भेटीच्या वस्तू दिल्या. पण आकाशांत हिंडणाऱ्या घारीचें लक्ष घरट्यांतल्या पिलांकडे असतें. त्याप्रमाणें श्वाइत्झरचें लक्ष आपल्या जिवापलीकडे असलेल्या सेवाकेंद्राकडे होते. ज्या भेटीच्या वस्तू येत त्या लॅम्बेरेनेकडे रवाना होत. लॅम्बेरेनेला आपण लावलेला सेवेचा वृक्ष कसा पोसेल, कसा फुलेल फळेल याचीच काळजी त्यांना सारखी लागलेली. त्यामुळें त्या रुग्णालयासाठीं मदत मिळविण्याचें त्यांचें काम सतत चाललेलें असायचें. पण या सगळ्या खटाटोपांत स्वतःसाठीं, खाजगी, व्यक्तिगत लोभ थोडासुद्धां नाहीं. उलट त्याबाबतींतला निःस्पृहपणा लोकांनीं धडा घेण्यासारखा.

जर्मनींत गटें नांवाचा एक थोर कवि होऊन गेला. त्याच्या नांवानें एक बक्षिस ठेवलेलें होतें. डॉ. स्वाइत्झरनीं केलेल्या 'असामान्य मानवसेवेसाठीं' त्यांना तें देण्यांत आलें. त्या बक्षिसाची रक्कम बरीच मोठी होती. परंतु श्वाइत्झरनीं त्या रकमेचा उपयोग स्वत:साठीं करण्याचें नाकारलें. पुस्तकांची विक्री, पियानोचे जलसे यांतून तितकीच मोठी रक्कम जमवून त्यांनीं ती दान करून टाकली. आणि नंतरच त्यांनीं गटे–बक्षिसाच्या रकमेला स्पर्श केला !

त्यानंतर डॉ. श्वाइत्झर अनेकदां युरोपांत आले; आणि पुन्हां आपल्या सेवास्थानीं आफ्रिकेंत परत गेले. रुग्णालयांतील सुखसोयी वाढत होत्या. रुग्णालयाच्या इमारतींची संख्या वाढत होती. कामाचा व्यापहि वाढत होता. अशा स्थितींत १९३९ साल उजाडलें. जानेवारी-फेब्रुवारींत ते युरोपांत स्ट्रासबुर्गला होते. तेथें राहून बरेंच काम करण्याचें त्यांच्या मनांत होतें. पण त्यांना भावी संकटाची सावली दिसूं लागली. लवकरच पुन्हां दुसऱ्या महायुद्धाच्या ज्वाला भडकणार हें त्यांच्या दूरदृष्टीला दिसून आलें. मागल्या महायुद्धांत लॅम्बेरेनेच्या कामाची झालेली वाताहात त्यांच्या चांगलीच आठवणींत होती. पुन्हां तोच प्रसंग कोसळण्याचा धोका होता. कारण ते जर्मन नागरिक होते. जर्मनीची जगांतल्या इतर देशांशीं लढाई जुंपेल. फ्रान्स जर्मनीविरुद्ध उभा राहील. आणि पूर्वींप्रमाणें आपण पुन्हां शत्रुपक्षाचे म्हणून कैदेंत पडण्याची पाळी आपल्या-वर येईल. तेव्हां अगोदरच सावध होऊन रुग्णालयाचें–दवा-खान्याचें काम सुयंत्रपणें चालतें करून ठेवावें असें त्यांनीं ठर-विलें. हातांतलीं सारीं कामें बाजूला सारून ते तडक आफ्रि-केला निघाले.

आपल्यावर मागचाच प्रसंग आला तर रुग्णालयाचें काम बंद पडतां कामा नये. त्यांत कांहीं कमतरताहि येतां उपयोगी नाहीं. अशी सारी व्यवस्था त्यांनीं केली. आपल्या पश्चात

कामाचा डोलारा मागल्याप्रमाणें कोसळणार नाहीं अशी खात्री-लायक व्यवस्था त्यांनीं करून टाकली. यावेळीं ते आफ्रिकेंत आले तेव्हां मात्र त्यांना दहा वर्षेपर्यंत तिथून बाहेर पडतां आलें नाहीं.

अपेक्षेप्रमाणें युद्ध पेटलें. फ्रेंच सत्तेखालील आफ्रिकेचा प्रदेशहि त्यांत ओढला गेला. त्याच्या ज्वाला लॅम्बेरेनेला लागल्या. परंतु प्रत्यक्ष रुग्णालयाला मात्र कोणत्याच पक्षानें हात लावला नाहीं. तें सुरक्षित बचावलें.

१९४५ च्या १४ जानेवारीला डॉ. श्वाइत्झर यांचा सत्तरावा वाढदिवस होता. लॅम्बेरेनेंत तो मोठ्या उत्साहानें साजरा झाला. ७ मे दिवशीं बातमी आली कीं लढाई थांबली. तरीपण त्यांना युरोपांत यायला १९४८ चा उन्हाळा यावा लागला. युद्धाविषयीं त्यांनीं त्यावेळीं आपले विचार प्रकट केले. ते मोठे बोधप्रद आहेत. थोरामोठ्यांनींहि लक्षांत घेण्यासारखे आहेत. त्यांनीं म्हटलें आहे :

> " शस्त्रास्त्रें हीं वाईटच. दुष्टच. थोर अंतःकरणांनीं त्यांचा संबंध टाळलाच पाहिजे अगदीं आतां दुसरा कांहीं उपाय नाहीं, असें दिसून येईल तेव्हांच तीं असा उदात्त पुरुष उचलून हातीं धरतो. कारण शांतता व स्वस्थता यांचीच किंमत त्याला इतर कशाहिपेक्षां अधिक वाटत असते. त्याला विजयाचा हर्ष नसतो. कारण अशाप्रकारें (लढाईतील भयंकर प्राणहानीनंतर) मिळणाऱ्या विजयाविषयीं आनंद मानणें म्हणजे माणसांच्या कत्तलीबद्दल आनंद मानण्यासारखेंच आहे. जेव्हां युद्धाचा विजयसमारंभ साजरा करावयाचा असेल त्या वेळीं आपण जणूं काय उत्तर-क्रियाच करीत आहोंत असें त्यानें वागलें पाहिजे. असंख्य माणसें ठार मारलीं गेलीं आहेत, त्यांच्यासाठीं शोक केला पाहिजे. त्यांच्यासाठीं सहानुभूतीचीं आंसवें ढाळलीं पाहिजेत. "

१९४८ सालीं ते युरोपांत परत आले तेव्हां त्यांचें वय ७३ वर्षांचें होतें. तरीहि त्यांचें शरीरबळ कायम होतें. सेवेचा-

कामाचा उत्साह जसाच्या तसाच होता. आज त्यांच्या वयाला ब्यायशीं वर्षें होऊन गेलीं आहेत. शरिरानें ते थोडेबहुत थकलें असतील; परंतु त्यांचें मन अद्याप पूर्वींइतकेंच तरुण आहे, ताजेंतवानें आहे सेवेची रग त्यांच्यांत अजून कायम आहे. कांहीं माणसें परमेश्वरानें कांहीं विशिष्ट कामासाठींच जणूं जन्माला घातलेलीं असतात. डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर यांचें जीवन पाहून असेंच वाटतें. आफ्रिकेच्या अंधाऱ्या जगांत रोगराईनीं जर्जर झालेले लक्षावधि दु:खी-कष्टी जीव आहेत. गोऱ्या वसाहतवाल्यांनीं त्यांची आजवर यथेच्छ पिळवणूक केलेली आहे. अजूनहि ती थांबलेली नाहीं. परंतु भांगेंत तुळस उगवावी तसे डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर त्या दु:खी जीवांच्या मदतीसाठीं धांवून गेले. "ज्यासि आपंगिता नाहीं त्यासि धरी जो हृदयीं।" याप्रमाणें त्यांनीं निराधार निग्रोंना हृदयाशीं धरलें. आणि अशा माणसाला तुकाराम महाराजांनीं 'साधु' म्हटलें आहे. "तोचि साधु ओळखावा" अशी खूण सांगितली आहे. त्यांनीं केलेल्या कामगिरीची ओळख आपल्याला झाली. पण तें साध्य करण्यासाठीं त्यांनीं स्वत:ची कशी तयारी केली तेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांनीं जणूं या स्वत:च्या अनुभवावरूनच सांगून ठेवलें आहे :

> "जगांत उत्साह व स्वार्थत्याग याशिवाय खरी मोलाची अशी कोणतीच गोष्ट घडवितां येत नाहीं."

हे त्यांचे स्वानुभवाचे खडे बोल आहेत. त्यांनीं हजारों मैल दूरचे दीनदुबळे, रोगांनीं पछाडलेले नीग्रो सेवेसाठीं निवडले. त्यांच्या सेवेचें महत्कार्य केलें. सगळ्यांनाच कांहीं श्वाइत्झर होतां येत नाहीं. तरीपण प्रत्येकाला सेवा ही करतां येतेच; करतां आलीच पाहिजे. खरी, कळकळीची. मग त्यासाठीं गगनाला गवसणी घालण्याचें प्रत्येकालाच जमेल असें नाहीं. तरीपण, स्वत:च्या गांवापासून गल्लीपर्यंत सेवेसाठीं काय थोडें क्षेत्र आहे ?

22C79
1(6415
C79
371914

# व च नें

" जगांत पसरलेल्या दुःखानें माझें मन भरून जातें, हें खरें. तरीपण त्या प्रश्नाच्या विचारांतच केवळ माझें मन गुरफटून राहात नाहीं. माझें असें ठाम मत झालेलें आहे कीं, आपल्यापैकीं प्रत्येक जण या पर्वताएवढ्या दुःखांतला थोडासा भाग तरी जरूर नाहींसा करूं शकतो."

+++

" निष्ठा हा आध्यात्मिक जीवनाचा पाया आहे.—चालू पिढींत विचाराची मातब्बरी नाहींशी होऊं लागली. त्यामुळें निष्ठेची भावनाच लोप पावली; आणि सत्याचीहि तीच गत झाली. याचा अर्थ असा आहे कीं, हें सर्व सुधारायचें असेल तर विचाराच्या मार्गावर या पिढीला पुन्हां आणल्याशिवाय कांहीं दुसरा उपाय नाहीं."

+++

" आपल्या वसाहतींतील या (काळ्या) लोकांच्या हितासाठीं आपण सध्यां जी कांहीं धडपड करतों आहोंत ती म्हणजे मोठा परोपकार आहे असें आम्हीं गोऱ्या लोकांनीं समजण्याचें कारण नाहीं. त्यांच्या किनाऱ्याला आमचीं पहिलीं जहाजें लागलीं तेव्हांपासून त्यांना ज्या भयंकर हालअपेष्टा आपण भोगायला लावल्या त्याबद्दलची ही परतफेड आहे इतकेंच काय तें."

( डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर )

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
दा. क्र. ............ नों. दि. ............
वि. ............ क्र. ............

# लोकसेवक चरित्र-माला

लेखक
**अमरेन्द्र**

जगांतलें 'पर्वताएवढें' दुःख पाहून
ज्यांच्या अंतःकरणांतला
प्रेमसागर उचंबळून आला;
दुःखितांच्या, रंजल्या-गांजल्यांच्या
सेवेसाठीं आपली सारी हयात
ज्यांनीं मनापासून देऊन टाकली;
अशा—जगांतील
थोर मूक मानव-सेवकांचीं
हीं सोपीं सुबोध चरित्रें.

प्रत्येक पुस्तकाची किं. : ५० नये पैसे

हरिजन आणि आदिवासी
यांचा महान् उद्धारकर्ता
**लोकसेवक ठक्करबाप्पा**

✦

काळ्या नीग्रोंचा प्राणदाता
थोर गोरा सेवावीर
**डॉ. आल्बर्ट श्वाइत्झर**

✦

स्वतंत्र भारताचा
अभिनव क्रांतिवीर
**विनोबाजी भावे**

✦

दीन-दुःखितांच्या सेवेंतच
देवपूजा मानणारा सन्त
**गाडगे महाराज**

✦

महारोग्यांच्या सेवेसाठीं
स्वतःचे प्राण वेचणारा
**फादर डेमियन**

✦

याशिवाय इतर अनेक थोर
मानव-सेवकांचीं चरित्रें

IRBK-0106234
IRBK-0106234

वोरा अॅन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.
३, राऊंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.